नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८३/२०१३
नि. १११

वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव— दिवाकर वडीलांचे/पतीचे नांव — पांडुरंग राउळ
वय सुमारे ६० वर्षे, धंदा— सेवानिवृत्त
रा. मळगांव, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एम्.आय. सय्यद यांचेतर्फे

१. मी आज रोजी करारपत्रावर साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. ते करारपत्र महादेव रघुनाथ रेडकर व राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर यांच्यात झालेले होते. ते करारपत्र राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर हिने करून दिलेले होते. करारपत्रातील मिळकत ही मौजे मळगांव येथील राधाबाई हिच्या नांवावरची मिळकत होती. त्या मिळकतीचे क्षेत्र १९ गुंठे इतके होते. ते करारपत्र माझ्यासमक्ष करण्यात आलेले होते. मला ते नि. ०८ चे करारपत्र दाखवले ते तेच आहे. त्यावर महादेव सगुण सोनुर्लेकर यांची व त्यानंतर माझी समक्ष म्हणून सही आहे. तसेच त्यावर राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर हिचा अंगठा आहे. ते करारपत्र कोठे झाले हे मला आठवत नाही. त्या करारपत्रातील सर्व मजकूर बरोबर आहे.

उलटतपास प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. आर. एस्. बांवकर यांचेतर्फे

२. हे म्हणणे खरे नाही की, नि. ८ च्या करारपत्रावर माझी सही आहे हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या करारपत्रावर माझे नांव व पत्ता नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारातील मिळकत मळगांवची आहे हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, तो करार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी करून दिलेला नाही. मला या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ माहिती नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तो करार दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी करून दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—
(एम्.एस्.बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी

दिनांक :— २१/०२/२०१९.